KELKAR
INVESTMENT COUNSULTANTS
All Investment Needs One Destination


MUTUAL FUNDS


TAX SOLUTIONS


RETIRMENT SOLUTIONS


HEALTH INSURANCE

Office : 104 Shree Gajanan Prasad Soc. Prabhat Rd. Lane No 14, Anand Colany, Pune - 411 004.
GET IT ON Google Play
www.kelkarinvestments.com
9822742277 / 8087042787 kelkar.r@gmail.com

RNI. : MAHMAR / 2011 / 43064

।। श्री विश्वकर्मणें नमः।।

स्थापना: १९९५

भारत सरकार मान्यताप्राप्त

Posted at Patrica Channel STG.Office,GPO,Mumbai-01.
Published on 7th of Every Month
Posting Date: 7th/8th of Every Month

# विश्वकर्मा पंचाल

महाराष्ट्रव्यापी पंचाल सुवर्णकारांचे एकमेव बुलंद मासिक vpmonthly@gmail.com

उपसंपादक - सुनिल स. सागवेकर | उपसंपादक - मोहन ह. नगरकर | उपसंपादक - अतुल रा. देवरुखकर

**विश्वकर्मा पंचाल केवळ वृत्तपत्र नव्हे, तर समाजप्रबोधनाचे विचारपत्रक जे प्रत्येक समाजबांधवाच्या घरी पोहचलेच पाहिजे!**

REGD.NO.: MCE/215/2022-24 ☯ वर्ष १३ ☯ ०७ व ०८ संयुक्त अंक ☯ डिसेंबर २०२३-जानेवारी २०२४ ☯ मुंबई ☯ पृष्ठे - ६ ☯ मुल्य २रु.

## विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई संस्थेचा विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न




विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई संस्थेचा विद्यार्थी गुणगौरव सोहळा रविवार दिनांक ३ डिसेंबर २०२३ रोजी सुरेंद्र गावस्कर सभागृह, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, दुसरा मजला, अग्निशमन दलाच्या मागे, दादर पूर्व, मुंबई -१४ येथे संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. श्रीधर रा. सागवेकर यांच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष श्री. सुनील भार्गवशेठ सागवेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे कोलाडचे माननीय सरपंच श्री रविंद्र बंडू सागवेकर हे त्यांच्या काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रमास येऊ शकले नाहीत. प्रमुख मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ समाजश्रेष्ठी श्री. जगन्नाथ महादेव देवरुखकर व महासंघाचे अध्यक्ष श्री. सदानंद द.नगरकर, संस्थेचे माजी अध्यक्ष श्री विलास वि वाडेकर, उपाध्यक्ष श्री. उदय रा. सागवेकर, कार्याध्यक्ष श्री. प्रकाश अ वाडेकर, सौ. वैशाली वि. करंजवकर, महिला संघटना अध्यक्ष श्रीमती अनिता प्रमोद सागवेकर, संस्थेचे सल्लागार रघुनाथ गं. देवरुखकर, खजिनदार श्री. संतोष वि. देवरुखकर, मिरा रोड ते डहाणू रोड संलग्न शाखेचे अध्यक्ष श्री रोहिदास ह.नगरकर इत्यादींच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. उपस्थित सर्व विद्यार्थी मित्र मैत्रिणी, पालक, संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांचे कार्यक्रमासाठी सरचिटणीसांनी मन:पूर्वक स्वागत केले.

कार्यक्रमास सुरुवात करण्यापूर्वी गेल्या वर्षभरात समाजातील ज्या ज्ञात अज्ञात समाज बंधू-भगिनींचे निधन झाले अशांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सोहळ्याच्या सुरुवातीस सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रथम श्री गणेश व सुवर्णकारांचे आराध्य दैवत श्री विश्वकर्मा महाराज संत शिरोमणी नरहरी महाराज व सरस्वतीच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण केले व दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर ईशस्तवन व स्वागत गीताने मान्यवरांचे स्वागत झाल्यावर सरचिटणीसांनी सर्व मान्यवरांचा परिचय करून दिला व अध्यक्षांच्या हस्ते सर्व मान्यवरांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ

(पुढील वृत्त पान ५ वर....)

## विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार ज्ञाती संस्था जि.रत्नागिरीचा विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न




विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार ज्ञाती संस्था जि.रत्नागिरीचा विद्यार्थी गुणगौरव सोहळा रविवार दिनांक ०३ डिसेंबर २०२३ रोजी गणपतीपुळे येथील चिंतामणी काणे हॉल येथे जिल्हाध्यक्ष श्री.संजय बाळकृष्ण देवरुखकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच शेकडो समाजबांधवांच्या उपस्थितीत पार पडला.

व्यासपीठावर महासंघाचे माजी अध्यक्ष श्री.बोरसुतकर गुरुजी,जिल्हा उपाध्यक्ष श्री.विष्णू सागवेकर, जिल्हा उपाध्यक्ष श्री. हरुशेठ पालकर, जिल्हा खजिनदार श्री. गंगाधर बसणकर, जिल्हा सहसचिव पद्मा सागवेकर, गणपतीपुळे शाखा अध्यक्ष श्री. संजय पंडित, गणपतीपुळे शाखा सचिव सौ. संध्याताई देवरुखकर, शिक्षण फंड प्रमुख श्री.प्रीतम देवरुखकर, संगमेश्वर तालुका अध्यक्ष श्री.चंद्रकात सागवेकर, रत्नागिरी तालुका अध्यक्ष श्री.नरेंद्र सागवेकर, युवामंच प्रमुख राज देवरुखकर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सांस्कृतिक समिती प्रमुख श्री. विष्णू सागवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.विनायक पंडित यांच्या भजनाने झाली. त्याला त्यांचा मुलगा सार्थक याने पखवाज वादनाने उत्तम साथ दिली.नंतर पद्मावती उमेश देवरुखकर हिने भगवद गीतेचा १२ वा अध्याय सादर केला. शेवटी सानिका दिलीप वाडेकर हिने मोरया विनायका या गाण्यावर ईश्स्तवन सादर करुन उपस्थितांचे छान मनोरंजन झाले. कार्यक्रमाची सुरुवात प्रथेप्रमाणे मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर संध्याताई आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वागतगीत सादर केले.

शिक्षण फंड प्रमुख प्रीतम देवरुखकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.त्यात त्यांनी शैक्षणिक कर्जाबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले व भविष्यात एक त्याबाबत मार्गदर्शन शिबीर भरवण्याचा मानस व्यक्त केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दुर्वेश वसंत सागवेकर याने उत्तम केले. कार्यक्रमामध्ये

पुढील वृत्त पान ४ वर....

।।श्री विश्वकर्मणें नमः।।

**सस्नेह निमंत्रण**

विश्वकर्मा सुवर्णकार समाज, मुंबई संचालित

**विश्वकर्मा पंचाल**

**वधुवर सुचक केंद्र**

विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार ज्ञाती संस्था जि. रत्नागिरी व विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार ज्ञाती संस्था ता. संगमेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथे

## भव्य वधुवर मेळावा

**रविवार, दि. १८ फेब्रुवारी २०२४**

स्थळ - शुभगंधा मंगल कार्यालय, मयुरबाग, संगमेश्वर - देवरुख रोड, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी - ४१५६११

**आपल्या वधुवर नोंदणीसाठी संपर्क**

श्री सुनिल दत्ताराम देवरुखकर - ८६८९८ ७२३५२
श्री सुनिल सदानंद सागवेकर - ७७३८० ४९२०३
श्री मोहन हरिश्चंद्र नगरकर - ९८६९६ ६९०२०३
श्री अतुल रामचंद्र देवरुखकर - ९८३३६ ५५०८९

**विशेष सुचना :**

वधुवर मेळाव्यासाठी १७ फेब्रुवारी रोजी रात्री राहण्याची व्यवस्था व पहाटे (सकाळी) येणाऱ्या समाजबांधवांसाठी आंघोळीची व्यवस्था सभागृहात असेल. त्यासाठी मोबाईलद्वारे आगाऊ सुचीत करावे. दुपारी भोजनाची व्यवस्था केलेली आहे. संगमेश्वर बस डेपो येथून हॉलवर जाण्यासाठी वाहनाची व्यवस्था केलेली आहे.

**विश्वकर्मा पंचाल वधुवर सुचक केंद्र**

विश्वकर्मा सुवर्णकार समाज, मुंबई संचालित

**महिला संघटना** आयोजित

## मराठमोळा फॅशन वॉक

**स्पर्धेचे नियम :-**

१) स्पर्धेसाठी नोंदणी करणे अनिवार्य आहे.
२) स्पर्धा सर्व समाज बंधुभगिनींसाठी असेल.
३) स्पर्धकाने पारंपारिक पोषाखात यावे. प्रवेश फी १०० रुपये मात्र.
४) प्रत्येक स्पर्धकाला बोलण्यासाठी एक मिनिटाचा अवधी दिला जाईल.
५) प्रत्येक विभागातील प्रथम दोन विजेत्यांना पारितोषिक देण्यात येईल.
६) (गट १) - १६ वर्षाखालील, (गट २) - १६ ते ४५ वर्ष, (गट ३) - ४५ वर्षावरील.
७) नाव नोंदणी करण्यासाठी अंतिम तारिख ३१ जानेवारी २०२४ पर्यंत.

| गट १ | गट २ | गट ३ |
|---|---|---|
| प्रथम पारितोषिक २००१/- | प्रथम पारितोषिक ३००१/- | प्रथम पारितोषिक ३००१/- |
| द्वितीय पारितोषिक १००१/- | द्वितीय पारितोषिक २००१/- | द्वितीय पारितोषिक २००१/- |

• आपले स्नेहांकीत •

श्रीम. अनिता प्रमोद सागवेकर (अध्यक्ष)
श्रीम. श्रद्धा संतोष सागवेकर (सेक्रेटरी)

**नाव नोंदणीसाठी संपर्क** -: ८६५७६३२९७३ / ८८७९५९१४१२

# संपादकीय...

**"ज्ञातीबांधव जिथे, विश्वकर्मा पंचाल तिथे"**

## महाराष्ट्रव्यापी वधुवर मेळाव्यासाठी समाजबांधवांना आवाहन

विश्वकर्मा सुवर्णकार समाज, मुंबई च्या माध्यमातून विश्वकर्मा पंचाल मासिकाची उत्पत्ती झाली. अतिशय खडतर काळातही तीन दशकापुर्वी स्व.भार्गवशेठ शंकरशेठ सागवेकर यांच्यासमवेत असणाऱ्या सर्व बुजुर्ग नेत्यांच्या सहकार्याने दि.१९ फेब्रुवारी १९९५ रोजी दादर येथील संस्थेच्या कार्यालयात संत शिरोमणी नरहरी महाराजांच्या जयंती दिवशी शानदार प्रकाशन झाले. आणि आता ३० व्या वर्षात पदार्पण करीत अनेक संकटे, समस्यांना तोंड देत वृत्तवाहिनीचा वसा समाजबांधवांनी आणि ज्ञाती संस्थांनी अखंड तेवत ठेवला आहे. हे सर्व करतांना विश्वकर्मा पंचालच्या माध्यमातून २० वर्षापूर्वी मुंबईतील ज्ञाती संस्थाना एका व्यासपीठावर आणून पहिला वधुवर मेळावा भव्य स्वरुपात प्रचंड गर्दीत साकारण्याचे भाग्य लाभले. चार वर्षापूर्वी रौप्यमहोत्सवानिमित्त देखील असाच वधुवर मेळावा समाजबांधवांसाठी आयोजित करण्यात आला होता.

कोवीडच्या खडतर कालखंडानंतर समाजबांधव पुन्हा नव्याने उभारी घेत असतांना विश्वकर्मा पंचाल तीन दशकांकडे वाटचाल करीत असतांना पुन्हा एकदा रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यात महाराष्ट्रातील ज्ञाती संस्थांच्या सहकार्याने **महाराष्ट्रव्यापी भव्य वधुवर मेळावा १८ फेब्रुवारी २०२४ रोजी** आयोजित केला आहे. हा मेळावा खंर तर समाजबांधवांना जणू ऐतिहासिक पर्वणीच ठरेल असा विश्वास आहे. दळणवळणाची साधने उपलब्ध असल्यामुळे या मेळाव्यास महाराष्ट्रातील ज्ञातीबांधव आणि ज्ञाती संस्था यांचा विहंगम संगम जणू मेळाव्याच्या निमित्ताने पहावयास मिळेल असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही. मात्र सर्व ज्ञाती संस्थानी समाजाला भेडसाविणाऱ्या वैवाहिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी एकजुटीने, एकमताने मेळाव्यासाठी योगदान दिले तरच हे शक्य होईल. फक्त वधुवर मेळाव्याचे आयोजन करुन समस्या सुटणार नाही. तर समाजबांधवांनी आपली वज्रमुठ एकवटली पाहिजे. समाजाच्या प्रत्येक कुटूंबातील उपवर वधुवरांच्या लग्नपत्रिका त्यासाठी वधुवर नोंदणीसाठी देणे गरजेचे आहे. काही निवडक मंडळींनी तर केवळ आपल्या वधुवरांच्या लग्नपत्रिका नोंद न करता आयत्या बिळावर नागोबा असा प्रकार करु नये. असा प्रकार घडू नये यासाठी प्रत्येक तालुक्यातील जागरुक लग्न जमविणाऱ्या समाजबांधवांनी आणी ज्ञाती संस्थांनी प्रत्येक कुटूंबातील लग्न पत्रिका विश्वकर्मा पंचाल वधुवर सुचक केंद्राकडे पाठविण्यासाठी सतर्क रहाणे गरजेचे आहे. संपुर्ण महाराष्ट्रातील पत्रिका एका व्यासपीठावर आल्यामुळे वधुवर केंद्राच्या माध्यमातून त्या महाराष्ट्रातील सर्व ज्ञातीबांधवांच्या घरोघरी व्हाट्सॲप आणि वेबसाईडच्या माध्यमातून सर्वदूर पोहोचतील. यामुळे आपल्या वधुवरांना देखील खुले व्यासपीठ उपलब्ध होईल. अनेक स्थळे उपलब्ध झाल्यामुळे समाजातील उपवर वधु-वर, अधिक वयाचे वधु-वर, परितक्त्या, घटस्फोटीत वधुवरांना पर्याय उपलब्ध होतील आणि विवाहविषयक समस्या सुटण्यास मोलाची मदत होईल. समाजातील वधुवर देखील मुक्तपणे पर्याय निवडण्यासाठी धजावतील. मनाप्रमाणे पर्याय त्यांच्यासाठी उपलब्ध झाल्यामुळे खऱ्या अर्थाने समाजसेवा होत असल्याचे अनुभवास येईल.

सदर वधुवर मेळाव्यासाठी खरं तर ज्यांना लग्न करावयाचे आहे अशांनी या मेळाव्यास प्रत्यक्ष हजर राहून सहकार्य करणे गरजेचे आहे. वधुवर आणि पालकहो, आपणासाठी समाजकार्यकर्ते अतिशय परिश्रमपुर्वक मेळाव्याचे आयोजन करीत आहेत ते केवळ समाजऋणाची जाणीव ठेवूनच. म्हणूनच महाराष्ट्रातील विविध शहरे आणि गावातून वधुवर मेळाव्यासाठी उपस्थित रहाणार असल्याचे मोबाईलद्वारे सुचीत करीत आहे. त्यांचा उत्साह पाहुन आता वधुवर मेळाव्याच्या आयोजकांनाही स्फुरण चढले आहे. संगमेश्वर आणि रत्नागिरी जिल्हा संस्था हा मेळावा यशस्वी करण्यासाठी नियोजन करुन आपल्या सेवेसाठी जय्यत तयारी करीत आहे. तेथील कार्यकर्तेही जोमाने एकवटले आहेत हे येथे अभिमानाने नमुद करावेसे वाटते. अनेक पालकांनी आपल्या जाण्यायेण्याची तिकीटीही आरक्षित केलेल्या आहेत. मुंबई, ठाणे, पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, रायगड, सिंधुदूर्ग, सुरत, रत्नागिरी जिल्ह्यातील तालुका संस्था आपआपल्या विभागात वधुवरांच्या लग्नपत्रिका एकत्र करुन त्या केंद्राकडे पाठविण्याच्या लगबगीत आहेत. संगमेश्वर बस डेपो येथून हॉलवर जाण्यासाठी वाहनाची व्यवस्था केलेली आहे. कार्यक्रम स्थळावर चहा आणि दुपारच्या भोजनाची व्यवस्थेसह वधुवर मेळावा विनाशुल्क म्हणजेच मोफत असेल याची नोंद समाजबांधवांनी घ्यावी.

तेंव्हा आपल्या स्वागतासाठी रत्नागिरी जिल्हा सज्ज आहे. आपण महाराष्ट्रातील सर्व ज्ञाती संस्था, लग्न जमविणारे समाजबांधव, लग्नासाठी इच्छुक वधुवर आणि पालक यांनी कृपया अगत्यपुर्वक ऊपस्थित राहून वधुवर मेळावा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे अशी ज्ञाती चरणी विनम्र प्रार्थना!

VISHWAKARMA SUVARNKAR SAHAKARI PATPEDHI LTD.
YEAR 1992

Your trust deserves the best interest.



Terms Deposit Scheme

SCHEME FROM 30 DAY'S TO 5 YEAR'S
WITH 4.25% TO 6.75% INTREST*

| Term | Rate of Interest* | Term | Rate of Interest* |
|---|---|---|---|
| 30 Day to 45 Day's | 4.25% | 13 Month to 24 Month | 6.25% |
| 46 Day to 3 Month | 4.50% | 25 Month to 36 Month | 6.50% |
| 3 Month to 6 Month | 5.00% | 36 Month to 60 Month | 6.75% |
| 7 Month to 12 Month | 5.50% | | |

Invest ₹ 1,000 or more | Simple interest calculation
0.50% Extra interest rate for Senior Sitizens above 60 years and Widows
*Only for members *T&C Apply

## सुवर्णकारांचे भीष्माचार्य सुवर्णरत्न स्व.मधुकरजी चाचड यांना आदरांजली



**स्व.मधुकरजी चाचड**
स्व.दि.२४ डिसेंबर २०२३

अखिल भारतीय सुवर्णकार संघाचे माजी अध्यक्ष सुवर्णकारांचे भीष्माचार्य सुवर्णरत्न स्व.मधुकरजी चाचड यांचे रविवार दिनांक २४ डिसेंबर २०२३ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी मुंबई सुवर्णकार संघ व महाराष्ट्र प्रदेश सुवर्णकार संघाच्या वतीने मंगळवार दिनांक ०२ जानेवारी २०२४ रोजी सायंकाळी ठीक ५.०० वाजता हरी महादेव वैद्य हॉल, पद्माबाई ठक्कर मार्ग, शिवसेना भवन जवळ, दादर (पू) मुंबई ४०००२८ येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी या शोकसभेत अखिल भारतीय सुवर्णकार संघ, महाराष्ट्र प्रदेश सुवर्णकार संघ व अनेक सामाजिक संस्थेचे पदाधिकारी व सुवर्णकार बांधव आपल्या स्वर्गीय नेत्याला आदरांजली वाहण्यासाठी उपस्थित राहिले होते.

या शोकसभेत विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई संस्थेचे माजी अध्यक्ष व महासंघाचे अध्यक्ष श्री.सदानंद द.नगरकर यांनी चाचड काकांना संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्यासह विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई संस्थेचे उपाध्यक्ष सुनील भा. सागवेकर अंधेरी, खजिनदार संतोष वि. देवरुखकर, वि.पं.मासिक संपादक सुनील द. देवरुखकर, राजू पंडित, श्री.सुनील का.सागवेकर (रा.सानपाडा), प्रकाश अ. नगरकर डॉ.सौ.सुरेखा चंद्रशेखर चाचड -वारणकर (स्व.मधुकरजी चाचड यांची सुन) इ. उपस्थित होते.

## ❁ हार्दिक अभिनंदन ❁

### ओम पोतदार यास ज्युदो मध्ये सिल्वर मेडल



२ व ३ डिसेंबर २०२३ रोजी झालेल्या कोल्हापूर ज्युदो असोसिएशन व रोटरी क्लब तर्फे ज्युदो स्पर्धा मध्ये ५० किलो आतील वजनी गटात कु.ओम अनिष पोतदार, कोल्हापूर याला सिल्वर मेडल मिळाले. त्याचे खूप खूप अभिनंदन. ओमने यापूर्वी विविध खेळात अनेक पदकांची लयलूट करून उत्तम चमक दाखविली आहे. त्याचे अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा! विबग्योर स्कुलच्या वतीने सदर स्पर्धेचे आयोजन कोल्हापूर येथे केले होते.

### कु.मंदार कॅरम स्पर्धेमध्ये अजिंक्य



मुंबई : पार्ले टिळक विद्यालय अजिंक्य गं. द. आंबेकर स्मृती चषक आंतरशालेय सुपर लीग कॅरम स्पर्धेचे अजिंक्यपद पार्ले टिळक विद्यालय कॅरम संघाने पटकाविले. कु.मंदार अरुण पालकर, अमेय जंगम, सार्थक केरकर यांच्या विजयी खेळामुळे पार्ले टिळक विद्यालयाने कुर्ल्याच्या सेस मायकल हायस्कूलचा ३-० असा पराभव केला. राष्ट्रीय मिल मजदूर संघ व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी तर्फे ३२ शाळांच्या सहभागाने झालेल्या विनाशुल्क सुपर लीग शालेय कॅरम स्पर्धेचे आयोजन केले होते.

### म.रा. मॉंटेक्स बॉल क्रिकेटचा चॅम्पियन चि. श्लोक



नुकत्याच गोंदिया येथे झालेल्या म. रा. अजिंक्यपद मॉंटेक्स बॉल क्रिकेट चॅम्पियनशिप या स्पर्धेचे विजेतपद चि. श्लोक धावडस्कर व त्याच्या संघाने पटकावले. या उल्लेखनीय यशाबद्दल त्याचे वि.सु.स. च्या कार्यकारिणीने अभिनंदन केले. यावेळी अध्यक्ष श्री. सागवेकर यांनी प्रशस्तीपत्रक व क्रिकेट मार्गदर्शक श्री. मुकेश नगरकर यांनी सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला.
तसेच समाजातील विशेष प्रावीण्य मिळवलेल्या मुलांचा वेळोवेळी सन्मान करण्याचे मत किशोर पोतदार यांनी मांडले. यावेळी विलास पंडीत, मुकेश निवंडकर, नारायण देवरुखकर, बाबू करजवकर, प्रितम पोतदार, सोमनाथ पोतदार, उपस्थीत होते. श्री. गणेश धावडसकर यांनी मुलाच्या सत्काराबद्दल आभार व्यक्त केले.

### कु.जुईचे अभिनंदन आणि लाख लाख शुभेच्छा!



स्वातंत्र्यसैनिक कै. मोरेश्वर रहाळकर स्मणार्थ महाड तालूका चेस असोसिएशन तर्फे महाड तालुका मर्यादित ठेवण्यात आलेल्या भव्य बुद्धिबळ स्पर्धा दि.२४ डिसेंबर २०२३ रोजी श्री विरेश्वर मंदिर हॉलमध्ये घेण्यात आली. महिला गट वय वर्षे १९ स्पर्धेत कु. जुई रुपेश देवरुखकर वय वर्षे १४ हिने प्रथम क्रमांक पटकवल्याबद्दल मन:पूर्वक शुभेच्छा!

### रविंद्र करंजवकर यांचीसंचालकपदी बिनविरोध निवड



शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित १५०० कोटीकडे वाटचाल करीतमहाराष्ट्र भर ३२ शाखांसहित, सुप्रसिद्ध या संस्थेच्या पुढील पंचवार्षिक सन २०२३ ते २०२८ या कालावधीकरिता बिनविरोध संचालकपदी निवडून आल्याबद्धल श्री. रविंद्र गणपत करंजवकर यांचे विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई संस्था व संस्थेची सर्व अंगे आणि समस्त समाजबंधू भगिनींकडून हार्दिक अभिनंदन व पुढील भवितव्यासाठी हार्दिक शुभेच्छा!!

### श्री विश्वकर्मा सुवर्णकार समाज संस्था कोल्हापूरची मिटिंग संपन्न



श्री विश्वकर्मा सुवर्णकार समाज संस्था कोल्हापूर ची मिटिंग संपन्न झाली. समाज संस्थेच्या अध्यक्षपदी **श्री पांडुरंग चंद्रप्पा पोतदार** (लाडवाडी) व उपाध्यक्षपदी **श्री दीपक सुरेश पोतदार** ( माणगाव ) यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या दोघांचे हार्दिक हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीला शुभेच्छा!

# महादेव विश्राम पंडीत परिवार सातारा स्नेह मेळावा






### कै. श्री.महादेव विश्राम पंडित, यांचे कार्य

सातारा येथे आले तेव्हा त्यांच्याकडे काहीही नव्हते, स्वबळावर सातारा येथे शहरात खणआळी येथे स्वतःचे दुकान घेतले, येवढ्या मोठ्या परिवाराचा योग्य रितीने सांभाळ केला, कित्येक जणांना आपल्या स्वतःच्या दुकानात सोनार काम शिकवले, स्वतःच्या पायावर उभे केले, सक्षम केले, स्वखर्चाने काही जणांची लग्न लावून दिली, गाजावाजा न करता ते त्यांच कार्य करत राहिले, पुढील पिढीला आजोबांच्या कार्याची आठवण करून देण्यासाठी सातारा येथे पंडीत परिवाराचा स्नेहमेळावा, स्नेह भोजनाचा कार्यक्रम हॉटेल राधिका पॅलेस सातारा येथे दिनांक-१६ डिसेंबर २०२३ रोजी, सर्व परिवाराच्या सहकार्याने, सहभागामुळे अतिशय उत्तम रितीने संपन्न झाला. विशेष सहकार्यः-श्री. दिपक रा. पोतदार, जयसिंगपूर, यांनी स्मृती चिन्हे करून दिली.

तीन महिन्यापुर्वी माझी मोठी मुलगी सौ. मधुमतीने तिच्या काही मोठ्या भावांना (मामाची मुले) बोलावून घेतले फोन वरून थोडक्यात माहिती त्याना दिली होती. त्याप्रमाणे विचार, करून सचिन पंडीत नितिन पंडीत, प्रदिप वाडेकर ही मुले आली मग काय तिने सांगीतले की, आपले आजोबा महादेव विश्राम पंडीत यांच्या स्मृतीप्रित्यर्थ स्नेह मेळावा आपण करायचा आहे, ते तिघेजण तयार झाले, मग काय प्रत्येकांनी आपल्या भावंडांना फोन लावले. सर्वांना फारच आनंद झाला. सर्वांची संमती असल्यामुळे कार्यक्रम कसा आणि कुठे करायचा हे माझ्या मोठ्या मुलीने (मधुमतीने) सर्वांना सांगितले की आपण हा सोहळा आपण भावंड मिळून करणार आहोत तो मोठा झालाच पाहिजे. मग त्यांनी राधिका पॅलेस बुक करूया असे ठरविले, ते बुकींग मिळाले १८ तारखेचे. म्हणजे डिसेंबर १६/१२/२०२३ चे त्याप्रमाणे त्यानी: माझ्या मुली म्हणजे सौ. मंजुषा नेवरेकर, सौ वैशाली नगरकर यांना सांगितले. माझ्या बहिणी सौ. मंगला पालकर, सौ.सरोजनी पोतदार व सौ. हेमलता नेवरेकर यांना फोन लावून तारीख कळविली. या मुलाचा प्लॅन चालू होता मी महाडला माझ्या नातवांच्या लग्नात होते. सर्व झाल्यानंतर माझी मुलगी मला म्हणाली आई चल तुला मी सातारला सोडायला येते, मला नवल वाटले. त्याप्रमाणे आम्ही शुक्रवारी १५ तारखेला सातारला आलो, शनिवारी सकाळी तिने मला सर्व सांगितले. मला तर खरचं वाटले नाही. पण मी जे ऐकलं होतं ते ह्या मुलांनी अमलात आणले होते. वाटलं घरगुती असेल पण तिने मला राधिका पॅलेसमध्ये नेले. अहो, मला खरंच आश्चर्याचा धक्का बसला केवढी मोठी तयारी. खरच माझ्या वडिलांचा मोठा फोटो सजविलेला पाहून मला गहिवरून आले. किती भाग्यवान माझे वडील आणि आम्ही सर्व भावंडे. तिथले वातावरण फारच आनंदी होते. माझ्या तिन्ही बहिणी,माझ्या मुली, भावंडाची मुलं एकत्र बघून मला समाधान वाटले. माझ्या वडिलांचे संस्कार होते ते. त्यांच्या नातवंडाने जपलेले बघितले माझ्या बहिणींनी. मी आता तिथे मोठी असल्यामुळे प्रथम मला खुर्चीत बसविले. नंतर त्या पण माझ्याशी शेजारी बसल्यानंतर माझ्या मोठ्या मुलीने शाल श्रीफळ आणि वडिलांचा फोटो असलेली ट्रॉफी देऊन माझा सत्कार केला.पाठोपाठ माझ्या तिन्ही बहिणींचा शाल श्रीफळ व ट्रॉफी देऊन सत्कार केला. खरं म्हणजे मी सर्व बघत राहिले आणि बर का आम्हालाच नाही तर स्वतःच्या सर्व भावंडांना ट्रॉफी, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केल्यानंतर छोटी छोटी भाषणे पण झाली. कार्यक्रम आटपून आम्ही भोजनास गेलो आणि काय आश्चर्य एका ताटात पाच पाच वाट्या. अरे बापरे, मी पाहिले होते पण प्रत्यक्षात आज बघते आहे. वाटलं नव्हतं असे मी जेवण पण वडिलांच्या आशीर्वादाने आज हे दिवस बघते आहे. अशीच ही सर्व भावंडे एकत्र येऊन असाच कार्यक्रम दरवर्षी करतील अशी माझी खात्री आहे. त्यांना माझ्याकडून खूप खूप आशीर्वाद (श्रीमती मालती दत्तात्रय सागवेकर ८२ वर्षे) धन्यवाद..

# सरपंचपदी सौ.सलोनी सु. देवरूखकर यांची निवड



खेड तालुक्यातील चिरणी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी आपल्या सुवर्णकार समाजातील महिला भगिनी सौ.सलोनी सुरेश देवरूखकर यांची निवड झाली याबद्दल विश्वकर्मा सुवर्णकार समाज.मुंबई संस्था कार्यकारिणी,महिला मंडळ ,व सर्व समाज वतीने हार्दिक हार्दिक अभिनंदन व भावी वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा.... आपल्या सुवर्णकार समाजातील महिला उच्चस्थानी पोहचून प्रतिनिधित्व करते हे अभिमानास्पद आहे.आपल्या हातून समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचेल असे मोठे व आदर्शवत समाजकार्य घडो.आणि आम्हाला आपले कौतुक करणेची संधी वारंवार मिळत राहो.ही सदिच्छा. पुनःश्च शुभेच्छा..

# विश्वकर्मा सुवर्णकार समाज, मुंबई संचालित युवामंच आयोजित YPL २०२३ - पर्व तिसरे अंडरआर्म बॉक्स क्रिकेट सामने उत्साहात संपन्न





विलेपार्ले विभाग संघ विजेता तर वि.सु.ज्ञा.स.गिरगाव संघ उपविजेता

विश्वकर्मा सुवर्णकार समाज, मुंबई संचालित "युवामंच" च्या मार्फत "महाराष्ट्रातील सुवर्णकार समाजाअंतर्गत भव्य अंडरआर्म बॉक्स क्रिकेट सामने" दिनांक २३ आणि २४ डिसेंबर २०२३ रोजी श्रमिक जिमखाना मैदान, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल येथे आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास समाजातील समाजबांधवासोबत युवावर्गाचा विशेष सहभाग लाभला. यामध्ये तब्बल १६ संघ सहभागी झाले होते. यामध्ये दिवा-डोंबिवली विभाग, मीरा रोड ते डहाणू विभाग, गोवंडी, वि.सु.ज्ञा.स. गिरगाव, विलेपार्ले, काळाचौकी, परेल, आंबोली-अंधेरी, कांदिवली, मरोळ, अंधेरी१, अंधेरी२, सांताक्रूझ, पालगड-दापोली, युवामंच, कुर्ला या संघांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला होता. तर युवामंच A, युवामंच B, संस्थेच्या वरिष्ठ कार्यकारिणी मधून विश्वकर्मा वरीष्ठ A आणि विश्वकर्मा वरिष्ठ B या संघानी मनोरंजन म्हणून सहभाग घेतला होता. यावेळीचे एक नवीन आकर्षण म्हणजे संस्थेच्या महिला संघटनेने आपले २ संघ तयार करून सामने खेळण्याची उमेद दाखविली. एकूण १६ संघांमध्ये लढत होऊन अखेर विजेतेपदावर विलेपार्ले संघाने तर उपविजेतेपदावर वि. सु.ज्ञा.स. गिरगाव संघाने शिक्कामोर्तब केला. याचबरोबर उत्कृष्ट फलंदाज - अभिषेक तळेकर (विलेपार्ले संघ) आणि उत्कृष्ट गोलंदाज - जितेंद्र देवरुखकर (गिरगाव) यांना मिळाले. या विजयी संघांचे, खेळाडूंचे व उपस्थित पदाधिकारी, समाजबांधवांचे युवामंचकडून जाहीर आभार!!!

खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी वि.सु.स.मुंबई संस्थेचे सरचिटणीस श्री.मोहन ह.नगरकर, विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार महासंघाचे अध्यक्ष श्री. सदानंद द.नगरकर, उपरोक्त संस्थेचे माजी अध्यक्ष श्री. विलास वि.वाडेकर, संस्थेचे सहचिटणीस श्री.राजेंद्र वा. पंडित, खजिनदार श्री. संतोष वि. देवरुखकर, शिक्षण समिती सदस्य श्री.दीपक र. सागवेकर, श्री.भरत र. सागवेकर, वि.सु.स.पतपेढी अध्यक्ष श्री. मनोहर ल. पालकर, उपाध्यक्ष श्री.योगेश ह. सागवेकर, सल्लागार श्री. तानाजी सागवेकर, महिला संघटना अध्यक्षा श्रीमती अनिता प्र.सागवेकर, कार्याध्यक्षा सौ. वैशाली वि. करंजवकर, सदस्य सौ. विभा ग. सागवेकर, सदस्य कु. रत्नावली चिखलकर, विश्वकर्मा पंचाल मासिकाचे संपादक श्री. सुनील द. देवरुखकर, युवामंच अध्यक्ष श्री. गणेश द. सागवेकर, सरचिटणीस श्री.अतुल रा. देवरुखकर, सहचिटणीस श्री.संदीप वि. वाडेकर, कार्याध्यक्ष श्री.प्रसाद ग. चिखलकर व श्री.मंगेश र.पालकर, श्री.अमित म. पालकर, श्री. विलास स. सागवेकर, खजिनदार कु.ओमकार सु. सागवेकर व उपखजिनदार श्री.आशिष अ. पालकर व श्री.अजय स. आगवेकर, श्री.अमोल रा. सागवेकर, कु.शुभम रा. सागवेकर, युवामंच नवनिर्वाचित सदस्य श्री. अनिकेत पोतदार, कु. दिपेश पालकर, कु. सुमित देवरुखकर, मीरा रोड ते डहाणू शाखेचे अध्यक्ष श्री.रोहिदास ह. नगरकर, मीरा रोड ते डहाणुरोड शाखा माजीअध्यक्ष श्री.पांडुरंग गो. वाडेकर, माजी युवामंच कार्यकर्ते श्री. दिनेश सागवेकर तसेच वि. सु.ज्ञा.स. गिरगाव संस्थेचे अध्यक्ष श्री.विकास नगरकर व माजी अध्यक्ष रवींद्र कृ. देवरुखकर, श्री.रविंद्र ग. करंजवकर तसेच संस्थेचे कार्यकर्ते आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते. आलेल्या सर्व मान्यवरांचे, पदाधिकारी, कार्यकर्ते यांचे युवामंचतर्फे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित वरिष्ठ मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन-प्रतिमापूजन करण्यात आले. यानंतर पतपेढीचे उपाध्यक्ष श्री.योगेश ह. सागवेकर यांच्या हस्ते मैदानाचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते नाणेफेक करून उद्घाटनीय सामना मरोळ विरुद्ध गोवंडी या संघांमध्ये खेळविण्यात आला. यामध्ये गोवंडी संघ विजयी झाला. यानंतर YPL २०२३ च्या सामन्यांना सुरुवात झाली. प्रत्येक टीम आपला सर्वोत्तम खेळ दाखवत होती. प्रत्येक खेळाडूमध्ये जिंकण्याची जिद्द दिसत होती. परंतु कोणी धावचीत होत, त्रिफळाचीत होत, झेलबाद होत सामने रंगतदार होऊन अखेर अंतिम सामना विलेपार्ले विभाग व वि.सु.ज्ञा.स. गिरगाव यांच्या नावे नोंदविण्यात आला आणि दोन्ही संघांचा आनंद आणि आत्मविश्वास अवर्णनीय होता. दोन्ही संघ विजेते पदाच्या ट्रॉफी वर नाव कोरण्याचे स्वप्न पाहत होते.

उपस्थित सर्वाना खेळाची मजा लुटायची होती. यामध्येच युवामंच उपस्थित सदस्य आणि उपस्थित समाजबांधव यांना एकत्र करून युवामंच A (कर्णधार - अतुल देवरुखकर) आणि युवामंच B (कर्णधार - प्रसाद चिखलकर) अशा दोन टीम करण्यात आल्या. मौज-मजा-मस्ती करत खेळलेल्या या सामन्यात अखेर "युवामंच A टीम" विजयी झाली आणि सर्वांनी नाचत आनंद साजरा केला. यानंतर वरिष्ठ कार्यकारिणीचा सामना "विश्वकर्मा वरिष्ठ A (कर्णधार - सदानंद नगरकर)" आणि "विश्वकर्मा वरिष्ठ B (कर्णधार - मोहन नगरकर)" असा खेळविण्यात आला. आपल्या वयाचा कोणताही विचार न करता तरुणाईचा जोश सर्वांमध्ये दिसत होता. दोन्ही संघांमध्ये विजयी होण्याची जिद्द दिसत होती. मौज-मजा-मस्ती करत खेळलेल्या या सामन्यात अखेर "विश्वकर्मा वरिष्ठ A" हा संघ विजयी झाला आणि सर्वांनी जल्लोषात आनंद साजरा केला. यानंतर न भूतो न भविष्यती असा संस्थेच्या इतिहासात पहिल्यांदाच संस्थेच्या महिला संघटना यांनी तयार केलेले महिलांचे "विश्वकर्मा महिला A (कर्णधार-विभा सागवेकर)" आणि "विश्वकर्मा महिला B (कर्णधार-अनिता सागवेकर)" हे संघ आपल्या ताकदीनिशी मैदानात सामने खेळायला उतरले. या सामन्यात अखेर "विश्वकर्मा महिला B" हा संघ विजयी झाला आणि सर्वांनी जल्लोषात आनंद साजरा केला. यानंतर ज्या क्षणाची सर्व आतुरतेने वाट पाहत होते तो अंतिम सामना विलेपार्ले विभाग संघ व वि. सु.ज्ञा.स. गिरगाव संघ या संघांमध्ये खेळण्यात आला. अटीतटीचा सामना होत अखेर विलेपार्ले विभाग संघ विजेता ठरले.

यानंतर बक्षीस समारंभास सुरुवात झाली, युवामंच सेक्रेटरी यांनी मान्यवरांना व्यासपीठावर आमंत्रित केले. उपस्थित संघांचे सहभाग घेतल्याबद्दल, तसेच देणगीदारांचे आभार मानले. सदर कार्यक्रमासाठी युवामंचला पुढीलप्रमाणे देणगीदार लाभले. श्री विश्वकर्मा डेव्हलपर्स यांसकडून प्रथम पारितोषिक रोख रु ५,५५५/- , श्रीमती अनिता प्रमोद सागवेकर यांसकडून व्दितीय पारितोषिक रोख रु ३३३३/- त्यांचे चिरंजीव आणि सून श्री.अंकित आणि सौ.तेजश्री यांच्या लग्नाच्या प्रथम वाढदिवसानिमित्त देण्यात आले. श्री.गणेश दत्तात्रय सागवेकर यांसकडून प्रथम परितोषिकांची ट्रॉफी स्व.दत्तात्रय मारुती सागवेकर यांच्या स्मरणार्थ व श्री. विजय विठ्ठल लंभाते यांसकडून व्दितीय पारितोषिकाची ट्रॉफी देण्यात आली. कै.रामचंद्र मनोहर देवरुखकर यांच्या स्मरणार्थ श्री. अतुल रामचंद्र देवरुखकर यांसकडून उत्कृष्ट फलंदाज-गोलंदाज ट्रॉफी देण्यात आली, श्री. मनोहर ल. पालकर यांसकडून वरिष्ठ सामना प्रथम पारितोषिकाची ट्रॉफी आणि सौ. माधवी अमित पालकर यांसकडून महिला सामना प्रथम पारितोषिकाची ट्रॉफी देण्यात आली. कार्यक्रमाच्या दिवशी देणगी स्वरुपात मोहन नगरकर, निलेश सागवेकर, पांडुरंग वाडेकर, संतोष देवरुखकर, चंद्रकांत देवरुखकर, संदीप वाडेकर, प्रसाद चिखलकर, वैशाली करंजवकर, रवींद्र करंजवकर, सुनील का. सागवेकर, विकास नगरकर, राजेंद्र पंडित, विराज पालकर, वि.सु.ज्ञा.स. गिरगाव संस्था, रोहिदास नगरकर यांनी देणगी देऊन सहकार्य केले या सर्वांचे युवामंच कडून जाहीर आभार मानण्यात आले.

यानंतर मान्यवरांना आपले मनोगत मांडण्यास विनंती केली. मोहन नगरकर यांनी युवामंच उत्तम कार्यक्रम राबवीत आलेला आहे हा हि उपक्रम उत्तम प्रकारे संपन्न झाला याबद्दल युवामंच टीमचे अभिनंदन केले. तसेच याहीपुढे असेच उपक्रम राबविण्यात यावेत संस्था योग्य ते सहकार्य करील असे आश्वासन देऊन शुभेच्छा दिल्या. योगेश सागवेकर यांनी आपला युवामंचचा प्रवासाची आठवण सांगताना युवामंचने गेली पंचवीस वर्षाच्या आठवणी सांगत युवामंचचे भरभरून कौतुक केले, १६ संघ आज इथे खेळले, त्यांना सहभाग घेण्यास भाग पाडले यातच युवामंच विजयी झाला असे मला वाटते. विजेत्या टीमचे अभिनंदन केले आणि युवामंच टीमला पुढील कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. सदानंद द. नगरकर यांनी खरोखर युवामंच जे कार्यक्रम राबवीत आहेत ते कौतुकास्पद आहेत यामुळे संस्थेच्या इतर अंगाना प्रेरणा मिळत आहे. सर्व अंगानी असे कार्य केले तर संस्थेचे कार्य समाजात सर्वांना हेवा वाटेल असे होईल. विजेत्या टीमचे अभिनंदन केले. सहभागी संघांचे महासंघातर्फे आभार मानले व युवामंच टीमला पुढील कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. गणेश सागवेकर यांनी १६ टीमचे युवामंच वतीने सहभागी झाल्याबद्दल आभार मानले. युवामंच प्रीमिअर लीग YPL २०२३ यासाठी सर्वात महत्वाचे संघ सहभागी होणे हे होते. जर आज संघ नसते आले तर YPL २०२३ यशस्वी होणे शक्य नव्हते असे मला वाटते. युवामंच कार्यकर्त्यांनी घेतलेली मेहनत, मान्यवरांचे उपस्थित राहिल्यब्द्द्ल आभार मानले व YPL २०२४ साठी असेच सहकार्य मिळावे यासाठी आवाहन केले. यानंतर युवामंच सेक्रेटरी अतुल देवरुखकर यांनी कार्यकर्त्यांचे आभार मानले. शुभम सागवेकर आणि प्रसाद चिखलकर, दिनेश सागवेकर विभा सागवेकर यांनी पोलिस परमिशन आणि BMC कडे जाऊन ग्राउंड परमिशन साठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले गेले तसेच अमित पालकर आणि अमोल सागवेकर यांनी सामने खेळविण्यासाठी विशेष योगदान दिले तर मंगेश पालकर यांनी संघ सहभागी होण्यासाठी विशेष प्रयत्न केले यासाठी अतुल देवरुखकर आणि गणेश सागवेकर यांची उत्तम साथ त्यांना लाभली. आशिष पालकर, ओमकार सागवेकर, विलास सागवेकर, अजय आगवेकर यांनी कार्यक्रमावेळी विशेष योगदान दिले. तसेच संदीप वाडेकर यांच्या सहयोगाने सामन्यासाठी पंच लाभले आणि कार्यक्रमावेळी ही त्यांचे योगदान मिळाले तसेच मंगेश करंजवकर-चहा नाष्टा व जेवणाची सोय करून दिली याबद्दल सर्वांचे आभार मानले. यानंतर विजेता संघ, उपविजेता संघ, उत्कृष्ट गोलंदाज आणि फलंदाज तसेच वरिष्ठ आणि महिला संघामध्ये झालेले विशेष सामने यांची पारितोषिके मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी खेळाडूंचा जल्लोष अवर्णनीय होता आणि युवामंच कार्यकारिणीचा ऊर अभिमानाने भरून आला होता. अशा रितीने नियोजीत वेळेनुसार सायंकाळी ६ वा. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

युवामंच, मुंबई

# विश्वकर्मा पं सु समाज तर्फे विद्यार्थी गुणगौरव व जेष्ठ समाज बांधव सत्कार सोहळा संपन्न



खेड तालुका विश्वकर्मा पं सु समाजा तर्फे विद्यार्थी गुणगौरव व जेष्ठ समाज बांधव सत्कार सोहळा संपन्न आयोजित करण्यात आला होता. समाजातील जेष्ठ समाज बांधव व समाजाचे अध्यक्ष.श्री-भास्कर पालकर यांनी दिप प्रज्वलित करून कार्यक्रमाची सुरुवात केली.सेक्रेटरी-श्री प्रकाश देवरुखकर यांनी प्रथम प्रस्तावना सादर केली. व हा कार्यक्रम करण्यामागील उद्दिष्टे व समाजाचे सुरू असलेले कामा बद्दल सविस्तर माहिती सादर केली. समाज बांधवांनी टाळ्या वाजवून दाद दिली. व्यासपीठावरील मान्यवरांनी थोडक्यात मनोगत व्यक्त केला. जेष्ठ नागरिक- १) बाळकृष्ण गोविंद करंजकर (सुकीवली) २) निर्मला बाळकृष्ण करंजकर (सुकीवली) ३)सुनंदा धोंडू नगरकर (सवेणी) ४) भागीरथी नारायण सागवेकर (सुकीवली) ५)पांडुरंग शिवराम नगरकर (मुंबके) ६) सुनिता वासुदेव वारणकर(काडवली) ७) महादेव केशव सागवेकर (सावेणी) ८) अशोक बाबु देवरुखकर (लोटे) ९) लक्ष्मण गणपत सागवेकर (खवटी) १०) सरस्वती मारुती देवरुखकर(सावेणी) तसेच विशेष सन्मान सोहळा आंबडस चिरणी गावच्या नवनिर्वाचित सरपंच सौ. सलोनी सुरेश देवरुखकर याना समाजाकडून सन्मानित करण्यात आले. विश्वकर्मा पं सु समाज प्रसिद्धी माध्यम प्रमुख वैभव सागवेकर यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थी गुणगौरव सण-२०२१/२०२२. मधील-१) प्रतीक दादा देवरुखकर (१०वी) २) प्रेरणा दादा देवरुखकर(१०वी) ३)भक्तीकुमार पुरूषोत्तम सागवेकर (१०वी) ४)निकिता प्रशांत करजुळकर (१०वी) ५)सोनाली अंकुश देवरुखकर(१०वी) ६)मिताली प्रभाकर पालकर(इंजिनिअर) या सर्वसमाज बांधव व भगिनी मातांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व संतश्रेष्ठ श्री नरहरी महाराज यांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. तसेच समाजातील गुणवंत विद्यार्थी व विशेष प्राविण्य मिळालेल्या गुणवंतांचा फोल्डर व पुष्पगुच्छ तसेच शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमा सोबतच आलेल्या समाज बांधवांसाठी नेत्र चिकित्सा शिबिर आयोजित केला होता. त्याचा लाभ सर्वसामाज बांधव व भगिनी यांनी घेतला. अध्यक्ष-श्री भास्कर पालकर यांनी समाजला संबोधित करते वेळी आपण लवकरात लवकर अजीवन सभासद होण्याचे आवाहन केले आहे.व समाजाच्या कामकाजाबाबत थोडक्यात माहिती दिली. या कार्यक्रमासाठी श्री मोहन सर वारणकर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. समजातील सर्व कार्यकारणी सदस्य यांचंही लाखमोलाचे सहकार्य लाभले.सौ. जान्हवी मयुर पालकर यांनी काढलेली रांगोळी याकडे सर्वांचे लक्ष वेधून राहिले. उपाध्यक्ष-श्री अशोक देवरुखकर यांनी सर्व समाज बांधवांचे आभार मानून अध्यक्षाच्या परवानगीने कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

# विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार ज्ञाती संस्था जि. रत्नागिरीचा विद्यार्थी गुणगौरव सोहळा



वृत्त पान १ वरुन
अगदी बालवाडीतल्या मुलांपासून ते पदवीधर विद्यार्थ्यांना तसेच कला क्रीडा क्षेत्रात उत्तम यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले. या वर्षी जिल्ह्यातून प्रथमच आपल्या समाजातील कोणी आयआयटी मधून पदवीधर झाले. कु. विशारद जयदास बोरसुतकर याने देशात तसेच जगभरात सर्वात कठीण समजल्या जाणाऱ्या आयआयटी जेईई मेन्स व ॲडव्हांस या दोन्ही परीक्षेत यश मिळवून आयआयटी मद्रास येथे Dual Degree Program अंतर्गत MTech साठी २०१८ ला प्रवेश मिळवला. ह्यावर्षी MTech पदवी मिळवून आता तो कॉलेज प्लेसमेंट मधून स्टँडर्ड चार्टर्ड बँक मध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून कामाला आहे. संस्थेला त्याचा तसेच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सार्थ अभिमान आहे. इतर क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या समाजबांधवांचाही सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमापूर्वी शिक्षण फंडच्या सर्व देणगीदाराना देणगी वाढवून देण्याबाबत आवाहन करण्यात आले होते. त्यालाही उत्तम प्रतिसाद मिळाला. सर्व देणगीदारांचे मनापासून आभार!

पद्मा सागवेकर यांनी फेब्रुवारी महिन्यात संगमेश्वर येथे होत असलेल्या वधू-वर मेळाव्यबाबत सभागृहाला माहिती दिली. गंगाधर बसणकर यांनी घटनेतील बदलासंदर्भात सभागृहाला माहिती दिली. जिल्हाध्यक्ष श्री.संजय देवरुखकर यांनी अध्यक्षीय भाषणात बोलताना सर्व समाजबांधवानी एकजुटीने काम करूया आणि आपली जी स्वप्ने आहेत ती पूर्ण करूया असे सांगितले.

कार्यक्रमाचा समारोप करताना उपाध्यक्ष श्री.विष्णू सागवेकर यांनी सर्वच विषयांवर सखोल मार्गदर्शन केले व सर्व उपस्थित समाजबांधवांचे तसेच सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.त्यानंतर सर्वांनी सहभोजनाचा लाभ घेतला.

# वैभव सागवेकर यांची विश्वकर्मा पं सु समाजाकडून प्रसिद्धी माध्यम प्रमुख पदी निवड



खेड तालुका विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार समाज खेड संस्था कडून वैभव सागवेकर यांची प्रसिद्धी माध्यम प्रमुख पदी निवड करण्यात आली आहे. सागवेकर हे गेले काही वर्षे या संस्थेमध्ये काम करत आहेत,तसेच सागवेकर यांना त्यांच्या कार्याबद्दल असणारी तळमळ लक्ष्यात घेता खेड तालुका विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार समाजा कडून सर्वानुमते जवाबदारी सोपवण्यात आली आहे. यावेळी श्री संत नरहरी महाराज नागरी सहकारी पतसंस्था चे अध्यक्ष-श्री रमेश सागवेकर, उपाध्यक्ष-जगजीवन देवरुखकर, विश्वकर्मा पं सु समाज खेड तालुका अध्यक्ष- श्री भास्कर पालकर, श्री प्रकाश देवरुखकर, उमेश देवरुखकर, विजय करंजवकर, पुरुषोत्तम पालकर, अशोक देवरुखकर, संतोष वारणकर, शशिकांत पालकर. आदी उपस्थित होते.तसेच सागवेकर यांना पुढील वाटचालीसाठी संस्थेमार्फत शुभेच्छा देण्यात आल्या.

## श्री. मनोहर महादेव सागवेकर



विश्वकर्मा पंचाल मासिकाचे सहाय्यक संपादक
९९६०४३६७०९

त्यांच्या परिवारात सहा जण वकील असल्या प्रित्यर्थ संगमेश्वर येथील वधुवर मेळाव्यासाठी सभागृह शुल्क १०,००० /- रुपये जाहीर केले आहेत. निवृत्तीनंतर सुद्धा त्यांचे विश्वकर्मा पंचाल मासिकविषयीं योगदान तसेच त्यांच्या उदार दातृत्वाबद्धल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

वकील नावे पुढील प्रमाणे :

**ॲड. श्री संजय मनोहर सागवेकर** (L.L.B. - नोटरी)
**ॲड. सौ. सपना संजय सागवेकर** (L.L.B.)
**ॲड. सौ. मनिषा हेमंत सागवेकर** (L.L.M.)
**ॲड. कु. श्रिया हेमंत सागवेकर** (L.L.M., लंडन)
**ॲड. श्री. सौरभ नंदकुमार देवरुखकर** (L.L.M.)
**ॲड. कु. अथर्व अनंत वारणकर** (L.L.B. – वर्ष ४थे -शिक्षण सुरु)

विश्वकर्मा पंचाल वधुवर सुचक केंद्रतर्फे यांचे शतशः आभार....

## विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई (रजि.) च्या वतीने सामुदायिक मौजीबंधनसाठी समाजबांधवाना जाहिर आवाहन!

विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई संस्थेच्या वतीने दि.२७ एप्रिल २०२४ रोजी सामुदायिक मौजीबंधन सोहळा आयोजित करण्यात येणार आहे. त्यानुसार ज्या सभासदांस आपल्या मुलांची मुंज (उपनयन संस्कार ) करण्याची इच्छा असल्यास, लवकरात लवकर संस्थेकडे नोंदणी करावी. मौजीबंधन नावे नोंदणीसाठी संबंधित विभागीय कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा अन्यथा दादर येथे संस्थेच्या कार्यालयात भेट द्यावी.

मौजीबंधन सोहळा ठिकाण नंतर कळविले जाईल.

# विश्वकर्मा सुवर्णकार समाज साताराचे ज्येष्ठ समाज बांधव श्री. रामचंद्र सागवेकर यांचे हस्ते दत्तजयंती सोहळ्यात महापूजा



दि.२६, गोळीबार मैदान, सातारा येथील समाज बांधव श्री. रामचंद्र सागवेकर हे निवृत्त प्रशासकीय अधिकारी असून सध्या नियमित समाजकार्य, मंदिर व्यवस्थापन व पुजारी असा बहुमूल्य सहभाग देतात. यंदाचा दत्तजन्मोत्सव महापुजेचा मान श्री. सागवेकर व कुटुंबीय यांना मिळाला. मंदिर प्रशासनाने त्यांच्यासह उपस्थित समाज बांधवांचा सत्कार केला. यावेळी श्री.आर. जी.पंडीत, श्री. किशोर पोतदार, श्री. अमर सागवेकर, नितीन पोतदार व संजय पंडीत यांचे उपस्थितीत सौ.सागवेकर यांनी आरोग्य धनसंपदा पत्रिकेची माहीती दिली. सर्व भक्तांजनाना श्री. सागवेकर यानी महाप्रसादाचे आयोजनही केले होते.

# खेड सवेणी उपसरपंचपदी उमेश देवरूखकर



खेड : तालुक्यातील सवेणी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी उमेश गणपत देवरूखकर यांची निवड करण्यात आली. ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

या निवडीबद्दल सरपंच मिना सावरटकर यांच्याहस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी सरपंच मुख्त्यार कावलेकर, राजन गुजर, सदस्या अक्षता सागवेकर, शमा कावलेकर, ग्रामसेविका जगताप यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. उपसरपंचपदाच्या माध्यमातून गावच्या विकासाला चालना देण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याची ग्वाही नूतन उपसरपंच उमेश देवरूखकर यांनी दिली.

## श्री. संत नरहरी महाराज नागरी सहकारी पतसंस्था खेड, सन २०२४ दिनदर्शिका प्रकाशन



श्री. संत नरहरी महाराज नागरी सहकारी पतसंस्था खेड, सन २०२४ दिनदर्शिका प्रकाशन सोहळा मंगळवार दिनांक १९ डिसेंबर २०२३ रोजी पतसंस्थेच्या ऑफिस मध्ये पतसंस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, खेड तालुका विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार समाज अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी, सल्लागार कार्यकारिणी, व समाजबांधवांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार समाजातील ज्येष्ठ सल्लागार श्री.शशिकांत पालकर,यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष. श्री. रमेश सागवेकर, उपाध्यक्ष श्री.जनजीवन देवरुखकर, खेड तालुक्यांच्या विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार समाजाचे अध्यक्ष श्री. भास्कर पालकर, उपाध्यक्ष व पतसंस्थेचे संचालक श्री.अशोक देवरुखकर सेक्रेटरी व पतसंस्था संचालक श्री.प्रकाश देवरुखकर, संचालक श्री.उमेश देवरुखकर, संचालक श्री.पुरुषोत्तम पालकर, श्री.विजय करंजुळकर, श्री.संतोष वारणकर,श्री.संतोष देवरुखकर, प्रसिध्दी माध्यम प्रमुख वैभव सागवेकर, पतसंस्थेचे सचिव प्रमोद गुरव व सर्व कर्मचारीवर्ग उपस्थित होते.

## वि. पं. सु. ज्ञाती संस्था जिल्हा रत्नागिरी, तालुका शाखा रत्नागिरी २०२४ चे कॅलेंडर प्रकाशन



**विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार ज्ञाती संस्था जिल्हा रत्नागिरी, तालुका शाखा रत्नागिरी चे २०२४ चे कॅलेंडर प्रकाशन रविवार दि.२४/१२/२०२३ रोजी जिल्हा संस्थेचे अध्यक्ष सन्माननीय श्री.संजय बा.देवरुखकर यांच्या हस्ते व महासंघाचे सचिव श्री.विष्णू न.सागवेकर आणि रत्नागिरी तालुका शाखेचे पदाधिकारी ,सल्लागार ,सदस्य व सर्व समाजबांधव यांच्या उपस्थितीत पार पडले.**

## वि.सु. स. मुंबई संस्थेचा विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न



वृत्त पान १ वरुन

देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची प्रस्तावना करताना सरचिटणीसांनी संस्थेच्या कारभाराविषयी सविस्तर माहिती दिली.

त्यानंतर विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याआधी उपस्थिताची करमणूक व्हावी म्हणून आपल्या समाजातील तरुण मुला-मुलींचे नृत्याचे कार्यक्रम झाले. विशेष करून संस्थेचे कार्यकर्ते श्री. मंगेश र.पालकर यांची छोटी कन्या कु. काव्या हिने सर्वांचे मन मोहित केले. तिच्या नृत्याला वन्स मोअर आवाज देण्यात आला. उपस्थितांमधून बऱ्याच लोकांनी तिचे कौतुक करून बक्षिसे दिली. ज्येष्ठ नृत्यांगना भारती देवरुखकर हिने लावणी नृत्य व झुमर या गाण्यावर उत्कृष्ट नृत्य करून सभागृहाची दाद मिळवली. दोन बहिणी श्रद्धा झाकणेकर व अनिता नेवरेकर यांनीही जोगवा व इतर गाण्यांवर नृत्य करून शाबासकी मिळवली. युवा मंच सरचिटणीस श्री संदीप वि. वाडेकर यांचा मुलगा समर्थ याने “खडूस खड्डे” या विषयावर एकपात्री नाटक केले त्यालाही प्रेक्षकांनी चांगली दाद दिली. कु. शुभम संजय सागवेकर याने संस्कृत श्लोक म्हणून दाखविला. भूषण निलेश नगरकर यांने एकाच राजा हे छत्रपती शिवाजी राजांची महती सांगणारे गीत सादर केले. महिला संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मंगळागौरीचा उत्कृष्ट





नृत्याविष्कार सादर केला. वय वर्ष ३० ते ६०/६५ च्या वयोगटातील महिलांनी आपल्यातील उपजत कला सादर करून (मात्र त्यासाठी त्यांनी भरपूर मेहनत घेतली होती) आम्ही कुठेही कमी पडत नाही आहोत हे दाखवून दिले.

या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे उपाध्यक्ष श्री उदय रा. सागवेकर यांनी आपल्या खुमासदार शैलीत केले.

त्यानंतर मुख्य कार्यक्रम विद्यार्थी गुणगौरव समारंभाचे सूत्रसंचालन शिक्षण समिती उपप्रमुख श्री समर्थ स. पालकर यांनी केले. पहिली ते पदवीधर उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे स्वागत करून मंचावरील सर्व मान्यवरांच्या हस्ते इयत्ता प्रमाणे विद्यार्थ्यांना बक्षीस व प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमास ज्या ज्या देणगीदारांनी सढळ हस्ते देणगी देऊन सहकार्य केले त्यांचे आभार मानण्यात आले. संस्थेचे कार्यकारी मंडळ, महिला संघटना पदाधिकारी, युवामंचचे कार्यकर्ते आणि सर्व उपस्थित त्यांनी कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडण्यास सहकार्य केले याबद्दल संस्थेतर्फे आभार व्यक्त करण्यात आले.

विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई संस्थेच्या विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यास समाजाच्या सर्व स्तरांवरून शुभेच्छा आल्या होत्या. शेवटी सरचिटणीस श्री मोहन ह.नगरकर यांनी सर्वांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.



## श्रीदेवी बागेश्री कसबा संगमेश्वर वार्षिक उत्सव

कसबा संगमेश्वर येथील बागेश्री मंदिरात गुरुवार दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी वार्षिक उत्सव पौष पौर्णिमा या दिवशी संपन्न होणार आहे. सदर दिवशी सकाळी अभिषेक, पूजा, तीर्थप्रसाद, दुपारी महाप्रसाद व सायंकाळी महिलांसाठी हळदीकुंकु समारंभ संपन्न होणार आहे - तरी सर्व समान बांधवानी देवीच्या दर्शनाचा तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा असे श्री.बोरसुतकर गुरुजी यांनी आवाहन केले आहे.

## पुणे सुवर्णकार ज्ञाती संस्था व पुणे सुवर्णकार स्त्रीशक्ती मंच यांच्याकडून कोजागिरी पौर्णिमेनिमित्त महा भोंडल्याचे आयोजन



पुणे सुवर्णकार ज्ञाती संस्था व पुणे सुवर्णकार स्त्रीशक्ती मंच यांच्याकडून कोजागिरी पौर्णिमेनिमित्त महा भोंडल्याचे आयोजन केलं होतं महिलांचा उत्स्फूर्त सहभाग होता सर्वांनी मनमुराद भोंडल्याचा आनंद घेतला होता एवढ्या महिला येणार होते याची माहिती मिळाली होती त्यामुळे भोंडल्याचा आयोजन वर्तक भाग शनिवार पेठ येथे आयोजन केलं होतं. समाजाचा ऑफिस या भोंडल्यासाठी कमी पडलं असतं म्हणून हे आयोजन आम्ही स्थानिक बागेत घेतलं असाच दरवर्षी महिलांचा सहभाग वाढत राहील यामध्ये दुमत नाही मी सर्व महिला मंडळांना कोजागिरी पौर्णिमेनिमित्त आणि दिवाळीनिमित्त हार्दिक शुभेच्छा देतो तसेच सुवर्णकार ज्ञाती संस्थेकडून आणि पुणे सुवर्णकार स्त्री शक्ती मंचाकडून सर्व समाज बांधवांना आणि विश्वकर्मा पंचाल महासंघ तसेच विश्वकर्मा पंचाल मासिक कार्यकारणी व सर्व महाराष्ट्रातील समाज बांधवांना हार्दिक शुभेच्छा......

शुभेच्छुक :- पुणे सुवर्णकार ज्ञाती संस्था पुणे सुवर्णकार स्त्रीशक्ती मंच आणि सर्व कार्यकारणी

## वि.पं.सु. समाज महासंघाची सभा पुणे येथे संपन्न

विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार समाज महासंघाची सभा रविवार दिनांक १९/११/२०२३ सकाळी ११ वाजता शनिवार पेठ, पुणे येथे महासंघाचे अध्यक्ष माननीय श्री सदानंद दत्तात्रय नगरकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी महासंघाचे सभासद व संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. या सभेची व्यवस्था सुवर्णकार ज्ञाती संस्था पुणे यांनी चांगल्या प्रकारे ठेवली होती. प्रथम सुवर्णकार ज्ञाती संस्था पुणेचे सरचिटणीस श्री अनिल नगरकर यांनी महासंघाचे सभेसाठी उपस्थित सर्वांचे पुण्यनगरीत स्वागत केले आणि महासंघाच्या सचिवांकडे पुढील सूत्रसंचालन करण्यासाठी पाचारण केले. महासंघाचे सचिव श्री विष्णू नरहर सागवेकर यांनी उपस्थितांचे स्वागत करून मान्यवरांना अभिवादन करण्यापूर्वी आपले आराध्य दैवतांना वंदन करून अध्यक्षांच्या परवानगीने सभेला सुरुवात करताना मागील सभेपासून आजपर्यंत स्वर्गवासी झालेल्या सर्व ज्ञाती बंधू भगिनी बद्दल दुःख व्यक्त केले. उपस्थित सर्वांनी शांत उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर सभेची नोटीस सहचिटणीस मोहन नगरकर यांनी वाचन केले. सभेची नोटीस सर्वांना पोस्टद्वारे पाठवण्यात आली असून महासंघाच्या व्हाट्सअप ग्रुपवर पण टाकण्यात आली. दिवाळीच्या सणामुळे पोस्टाने पाठवलेले नोटीस काही सभासदांना वेळेवर मिळाल्या नाहीत त्याबद्दल सचिवांनी दिलगिरी व्यक्त केली. तरी सुद्धा आपण मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांचे धन्यवाद व आभार मानले.


महासंघाचे माजी सदस्य ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गुळुंबचे श्री धाकटोबा नगरकर गुरुजी यांचे कौतुक करून त्यांनी अनेक चांगले मुद्दे मांडले. गट तट करून समाजाचे भले होणार नाही मुंबईच्या सर्व संस्था एकत्र येऊन कार्यक्रम करतात एकमेकांच्या कार्यक्रमाला जातात तसेच सर्व संस्थांच्या सभासदांनी एक मताने समाजकार्य केले पाहिजे. याबाबत श्री नगरकर गुरुजी म्हणाले पेपर मध्ये लिहले आहेत ते मी वाचले आहे. सर्वांनी एकत्र यायचे विचार असल्यावर असे का व्हावे दोन्ही संस्थेच्या कार्यकर्त्यांनी एकत्र आणुन महासंघाने समेट घडवून आणावा.

शेवटी विश्वकर्मा पंचाल मासिकाच्या माध्यमातून आपणां सर्वांच्या सहकार्याने १८ फेब्रुवारी २०२४ रोजी वधू वर मेळावा आयोजित करण्यात आला आहे. यासाठी आपण सर्वांनी सहकार्य करावे आणि विवाह जमविणे ही एक समस्या झाली आहे. ती कमी करण्यासाठी असे प्रयत्न होणे आवश्यक आहे असे महासंघाच्या अध्यक्षांनी या सभेत बोलताना सांगितले. त्यानंतर महासंघ सरचिटणीस यांनी सभा खेळीमेळीत पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने सभेची सांगता झाल्याचे जाहीर केले.

# भावपूर्ण श्रद्धांजली !


**मु.रेवतळे**,ता.महाड,जि.रायगड येथील ज्येष्ठ समाजभगिनी **श्रीमती सीताबाई शंकर वारणकर** यांचे दि.०४/११/२०२३ रोजी वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.त्यांच्या पश्चात चंद्रकांत,नंदू,लव आणि विष्णू असे चार मुलगे,सूना,नातवंडे असा परिवार आहे.


**दाभोळे** रत्नागिरी येथील समाज बंधू श्री भार्गव देवळेकर यांची पत्नी व श्री सचिन यशवंत देवरुखकर अंधेरी यांची सासुबाई **सौ.भारती भार्गव देवळेकर** (वय ५४ वर्ष) यांचे दि.०९/११/२०२३ रोजी दिर्घ आजाराने दुख:द निधन झाले.


**जोगेश्वरी** येथील जेष्ठ समाजभगिनी **गं.भा.पार्वती शंकर देवरुखकर** (वय ९१ वर्ष) यांचे दि.०९/११/२०२३ रोजी निधन झाले.श्री मंगेश श्रीधर देवरुखकर जोगेश्वरी यांची चुलती होती.

**पुणे** श्री संत नरहरी महाराज ग्रूप पुणे संस्थेचे विभाग प्रमुख श्री. विजय वसंत इगरुळकर यांचे वडिल **श्री. वसंत दगडु इगरुळकर** यांचे दिनांक ११/११/२०२३ रोजी संध्याकाळी ६ वाजता वयाच्या ७२ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.

**मानखुर्द** येथील जेष्ठ समाजबांधव **श्री. शांताराम शंकर सागवेकर** यांचे रविवार दिनांक १९-११-२०२३ रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ७५ व्या वर्षी देवाज्ञा झाली.


**धायरी** पुणे येथील ज्येष्ठ समाजबांधव **श्री . वसंत आत्माराम देवरुखकर** यांचे २३ नोव्हेंबर २०२३ रोजी दु:खद निधन झाले.

**दिवा** पूर्व येथील जेष्ठ समाजबांधव **श्री. पद्माकर मोरेश्वर सागवेकर** यांचे दि.२३/११/२०२३ रोजी अकस्मात निधन झाले.


**संगमेश्वर** तालुक्यातील कोळंबे येथील समाज बांधव अविनाश आणि जीतू बाळकृष्ण पोचरकर यांच्या मातोश्री **द्रौपदी बाळकृष्ण पोचरकर**( वय ८५ वर्षे ) यांचे वृद्धापकाळाने दि २४/११/२०२३ रोजी दु:खद निधन झाले.


**मु.कळसांबडे**,ता.तळा, रायगडच्या रहिवाशी **श्रीमती सुनंदा मनोहर नगरकर** यांचे दिनांक २७/११/२०२३ रोजी मुंबई उलवे राहत्या घरी अल्पशा आजाराने वयाच्या ७० व्या वर्षी निधन झालं आहे.


**दापोली** मुक्काम पालगड, ता.दापोली येथील ज्येष्ठ समाजबांधव **स्व. अशोक मारुती सागवेकर**, यांचे दिनांक २६ नोव्हेंबर कस्मात दु:खद निधन झाले. जोगेश्वरी येथील समाज बांधव श्री राजेंद्र मारूती सागवेकर याचे भाऊ आणि मुंबई युवा मंच अध्यक्ष श्री गणेश दत्तात्रेय सागवेकर, यांचे सख्खे चुलते होते.

श्रीसंत नरहरी महाराज ग्रूप संस्थेचे सभासद श्री शेखर रमाकांत निवंडिकर यांचे वडील **रमाकांत (बाळू) रामचंद्र निवंडीकर** यांचे रविवार दिनांक ३/१२/२०२३ रोजी दुपारी अल्पशा आजाराने वयाच्या ७६ व्यां वर्षी दु:खद निधन झाले.


**महाड** पोलादपूर, माणगांव सुवर्णकार समाजाचे सदस्य तसेच मंडणगड चे रहिवासी **श्री. रमेश नारायण कोळंबेकर** यांचे बुधवार दिनांक ६/१२/२०२३ रोजी सायंकाळी ६ वा अल्पशा आजाराने निधन झाले


**कोल्हापूर** बाजार भोगांव येथील ज्येष्ठ समाजबांधव **श्री. नारायण शंकरराव पोतदार** (भाऊ) यांचे ११ डिसेंबर २०२३ रोजी दु:खद निधन झाले.


**आंबोली**,अंधेरी प.जो. अँड हेलन गार्डन येथील समाजबांधव **श्री.रविंद्र चंद्रकांत पंडित** यांचे दि.१२/१२/२०२३ रोजी वयाच्या ५० व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.

**वाकवली**,दापोली येथील समाजबांधव श्री. नितीन रा.सागवेकर यांचे वडिल **श्री.रामचंद्र शंकर सागवेकर** यांचे दि.१३/१२/२०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.


**विरार** येथील समाजबांधव श्री नरेंद्र बबन सागवेकर यांची आई श्रीमती **वासंती बबन सागवेकर** यांचे दि.१७/१२/२०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.


**दक्षिण रायगड** सुवर्णकार समाजाचे माजी अध्यक्ष तसेच निवृत्त शिक्षक **श्री.विष्णू रामचंद्र पालकर** यांचे दि.१७/१२/२०२३ सकाळी १०.४५ दरम्यान अल्पशा आजाराने दुखद निधन झाले.


**दहिसर** येथील समाजबांधव **कु.शशांक नरहरी बोरसुतकर**,( वय ३४ वर्ष) (गाव बोरसुत ता. रत्नागिरी) यांचे शुक्रवार दि.२२/१२/२०२३ रोजी अल्पशा आजाराने येथे दुख:द निधन झाले.


**विलेपार्ले** पू.येथील समाजबंधू **श्री.प्रकाश वासुदेव पालकर** यांचे दि.२२/१२/२०२३ रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ६५ व्या वर्षी निधन झाले. वि.सु. सह.पतपेढीचे अध्यक्ष श्री.मनोहर ल.पालकर यांचे पुतणे होते.

**कल्याण** विभागातील समाज बंधू श्री सचिन शांताराम सागवेकर यांचे वडील **श्री शांताराम नारायण सागवेकर** (वय ५९ वर्ष ) यांचे दि.२५/१२/२०२३ रोजी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले.(गाव तेटवली सोनारवाडी,ता. दापोली जि. रत्नागिरी.)

विश्वकर्मा सुवर्णकार ज्ञाती समाज, गिरगांव या संस्थेचे माजी अध्यक्ष श्री. रविंद्र कृष्णा देवरुखकर यांच्या मातोश्री **सौ. शुभांगी कृष्णा देवरुखकर** यांचे दि.२५/१२/२०२३ रोजी संध्याकाळी ५:३० वाजता दिर्घ आजाराने निधन झाले.


विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई संस्थेचे जेष्ठ कार्यकर्ते श्री.पांडुरंग शि.देवरूखकर यांच्या पत्नी, युवामंचचे श्री.सतीश पां.देवरूखकर यांच्या मातोश्री **सौ. सरीता पांडुरंग देवरुखकर** यांचे दि.२९/१२/२०२३ रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ७४ व्या वर्षी निधन झाले.


बोरीवलीचे समाज बांधव श्री नंदकुमार पांडुरंग सागवेकर यांची भगिनी **श्रीमती शारदा गणेश पंडित**, राहणार नाणीज, यांचे शनिवार दिनांक ३०/१२/२०२३ रोजी वयाच्या ५३ व्या वर्षी दुख:द निधन झाले आहे.


श्री संत नरहरी सुवर्णकार समाज बोरीवली, मुंबई या संस्थेचे विद्यमान अध्यक्ष तसेच श्री संत नरहरी सहकारी पतसंस्था मर्यादित ह्या संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक माननीय **श्री महेंद्र महादेव वारणकर** यांचे शनिवार दिनांक ३०/१२/२०२३ रोजी अल्पशा आजाराने दुख:द निधन झाले.


**मालाड** येथील ज्येष्ठ समाजबांधव **श्री. प्रभाकर विष्णू देवरुखकर** (गाव पोचरी ता. संगमेश्वर) यांचे रविवार दिनांक ३१ डिसेंबर २०२३ रोजी वयाच्या ६१व्या वर्षी आकस्मिक निधन झाले. ते विश्वकर्मा सुवर्णकार समाज, मुंबई युवामंच अध्यक्ष गणेश द. सागवेकर यांचे मावस काका व विश्वकर्मा सुवर्णकार समाज, मुंबई संलग्न शाखा मीरा रोड ते डहाणू संस्थेचे माजी अध्यक्ष श्री. पांडुरंग गो. वाडेकर यांचे सख्खे भाऊ व सरचिटणीस श्री. गणेश सु. देवरुखकर यांचे चुलत भाऊ होते.

विश्वकर्मा पंचाल मासिकाचे माजी सहसंपादक **श्री.विजय धोंडूशेठ निवेंडकर** यांचे दि.०१/०१/२०२४ रोजी डोंबिवली येथे दीर्घ आजाराने निधन झाले.त्यांनी विश्वकर्मा पंचाल मासिकाच्या कामासाठी सहकुटूंब झोकून दिले होते.परंतु काही कालांतराने नोकरी व आजारपणामुळे ते यातून बाजूला झाले होते.


**लोटे** श्री. सदाशिव वारणकर गुरुजी (लोटेमाळ) यांची पत्नी **सौ.शारदा सदाशिव वारणकर** यांचे दि ०४/०१/२०२४ रोजी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले आहे.

**विश्वकर्मा सुवर्णकार सहकारी पतपेढी मर्यादित**
५ सय्यद अली चाळ, जमील नगर, भांडुप (प.), मुंबई - ४०००७८.
दूरध्वनी: ०२२ २४३७ ५३२९ email ID : vishwakarmapatpedhi@gmail.com

## जाहीर आवाहन

विश्वकर्मा सुवर्णकार सहकारी पतपेढी मर्यादितच्या सर्व सभादांना कळविण्यात येते की, पतसंस्थेच्या संचालक मंडळाचा कार्यकाळ मार्च २०२२ रोजी संपला असून याची सूचना या अगोदरच मासिकात जाहीर करण्यात आली होती. कोविड महामारीमुळे निवडणूक घेणे सहकार खात्यास शक्य झाले नाही. परंतु या चालू वर्षामध्ये आपल्या पतसंस्थेची संचालक मंडळाची निवडणूक कधीही जाहीर होऊ शकते. तत्पूर्वी इच्छुक उमेदवारांनी पतसंस्थेच्या कार्यालयात संपर्क साधावा.

आपले नम्र,
श्री. मनोहर ल. पालकर
(अध्यक्ष)
**विश्वकर्मा सुवर्णकार सहकारी पतपेढी मर्यादित**

## सर्व ज्ञाती संस्थांना सूचना

**विश्वकर्मा पंचाल मासिकाच्या वतीने येत्या काळात पत्रव्यवहार करून वधुवर सुचक केंद्रासाठी प्रतिनिधी देणे. विश्वकर्मा पंचाल मासिकाची थकीत वर्गणी तसेच आजीव सभासद नाहीत त्यांना आजीव सभासद करून घेणे व ज्यांचे पत्ते बदलले आहेत ते अपडेट करणे व काहींना पेपर मिळत नाहीत.**

**त्यांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी स्थानिक संस्थांचे प्रतिनिधी अथवा कार्यकर्त्यांना समाजबांधवानी कृपया सहकार्य करावे यासाठी विनंती करण्यात येत आहे.**


आपला
संपादक मंडळ

युवामंच तर्फे,
**वधु-वर संकेतस्थळ**
**www.vivah.vssmumbai.com**
येथे त्वरित वधुवर नोंदणी करा व इच्छुक स्थळांविषयी घरबसल्या माहिती मिळवा
**www.vssmumbai.com** वर
विश्वकर्मा पंचालवृत्तपत्र आता ऑनलाईन वाचा

**विश्वकर्मा पंचाल चे आजीवन सभासद व्हा**
आजीवन सभासद मुल्य १,०००/- (एक हजार रुपये मात्र) रोख अथवा चेक, डी.डी. "Vishwakarma Panchal" या नांवे द्यावा, खालील खात्यावर ट्रान्स्फर करावेत. यासाठी पुर्ण नांव व पुर्ण पोस्टल पत्ता पीन कोड सह, दुरध्वनी तसेच मोबाईल क्रमांक, सोबत एक फोटो पाठववा.
Bank Name: Saraswat Co-op. Bank Ltd.,
Branch- MadhuKendra, Dadar (w.),Mumbai,
A/c. No: 006200102908646, IFSC Code: SRCB0000006




**स्व.भार्गव शंकर सागवेकर**
स्व.आई व स्व.दादांच्या स्मृतीस
विनम्र अभिवादन!


मुर्तिमंत वात्सल्याची,
आम्ही घेतली अनुभुती,
आजही तुझ्या स्मृती,
नयनी दाटूनी येते पाणी!

आपले,
श्री. सुनिल भार्गव सागवेकर
सौ. प्रिती, श्रीमती अनिता,
कु.अंकीत, कु.मृणाली, कु.जित

**सागवेकर ज्वेलर्स**
१२९, सीता सदन, दुकान नं.१, बॉम्बे बझारच्या समोर, जे.पी. रोड, अंधेरी (प.), मुंबई - ५८. टेलि. : २६७७५७०५

**सागवेकर तारपाटा**
गीता इस्टेट, जय प्रकाश रोड, अंधेरी (प.), मुंबई - ५८. फोन : ६७७४५७०
- - - - - - - - - - - - - - -
निवासः बि-१०३, दिपाली को.ऑ.हौ. सोसायटी, बि.नं.३८, आझाद नगर, वि. रा.देसाई रोड, क्रिडा संकुलमागे, अंधेरी (प.), मुंबई -५३. टेलि.: २६७३४५७४, २६७७०४१६, ९३२२२७२६०१

**विश्वकर्मा पंचाल**
मालक
**विश्वकर्मा सुवर्णकार समाज** (रजि.) मुंबई
३५६ डब्ल्यु ८, चोकसी बिल्डींग, रानडे रोड, दादर (प), मुंबई-२८, ☎२४३७ ५३२९
-: नोंदणीकृत कार्यालय :-
अे-२,/५४, ओमकार, डॉ.आंबेडकर रोड, श्री समर्थ हनुमान पथ, काळाचौकी, मुंबई-३३
**प्रकाशक - मुद्रक - संपादक**
**श्री. सुनिल दत्ताराम देवरुखकर**
-: पत्रव्यवहार :-
एस-२,श्री कृपा, डॉ.आंबेडकर रोड, समर्थ हनुमान पथ, काळाचौकी, (चिंचपोकळी, पू.) मुंबई -३३.
संपर्क : ८६८९८ ७२३५२ व्हॉट्स अॅप
E-mail: vpmonthly@gmail.com
prasadart29@gmail.com
-: उपसंपादक :-
श्री. सुनिल स. सागवेकर - ७७३८०४१२०३
श्री. मोहन ह. नगरकर - ९८६९६६१०२०
श्री. अतुल रा. देवरुखकर - ९८३३६५५०८९
-: सहा.संपादक :-
श्री. मनोहर म. सागवेकर (पुणे) - ९९६०४३६७०९
श्री. संदिप वि. वाडेकर - ९८१९६३०२८५
श्री. गणेश द. सागवेकर - ९२२९६७२२९९
कु. शुभम रा. सागवेकर - ८२९१८६९०२२
कु. ओमकार सु. सागवेकर - ९१६७३३९८२०
श्री. आशिष अ. पालकर - ७७७८९४९८३०
**सल्लागार:**
**श्री. श्रीधर रा. सागवेकर**
(अध्यक्ष - विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई)
**श्री. सदानंद द. नगरकर**
(अध्यक्ष - वि.पं.सु.समाज महासंघ )
**कायदेविषयक सल्लागार**
**ॲड. सौरभ नरेंद्रकुमार देवरुखकर**- B.L.S., L.L.M
**विश्वकर्मा पंचाल वधुवर सुचक प्रमुख**
**श्री. पद्माकर बापुशेठ नगरकर**
संपर्क : ०२२२३७१७५४१, ९९६९६३४६८३

हे मासिक **मालक विश्वकर्मा सुवर्णकार समाज(रजि.) मुंबई**, चोकसी बिल्डींग, रानडे रोड, दादर (प), मुंबई - ४०००२८, ☎०२२ २४३७५३२९ यांचेसाठी **प्रकाशक-मुद्रक श्री. सुनिल देवरुखकर** यांनी **प्रसाद आर्ट**, एस-२, श्री कृपा, डॉ. आंबेडकर रोड, (चिंचपोकळी, पुर्व) काळाचौकी, मुंबई -४०००३३. येथे छापून अे-२/५४, ओमकार, डॉ.आंबेडकर रोड, श्री समर्थ हनुमान पथ, (चिंचपोकळी, पुर्व), काळाचौकी, मुंबई -४०००३३ येथून प्रकाशित केले.
**संपादकः सुनिल दत्ताराम देवरुखकर, भ्रमणध्वनी - ८६८९८७२३५२ । टीप : वृत्तपत्रातील बातम्या अथवा मजकूराशी संपादक अथवा संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.**
**कृपया आपल्या बातम्या व फोटो vpmonthly@gmail.com या ईमेलवर अथवा "विश्वकर्मा पंचाल" या व्हॉट्सअप ग्रुपवर पाठवाव्यात.**